घटक १

स्थूल आर्थिक उद्दिष्टे आणि धोरणे

समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे आणि धोरणे (Macro Economic Policies) :

चलनविषयक धोरण (Monetary Policy), राजकोषीय धोरण (Fiscal Policy) आणि परकीय व्यापार धोरण (Foreign Trade Policy) ही प्रमुख समग्रलक्षी आर्थिक धोरणे असून या धोरणांनाच समग्रलक्षी आर्थिक धोरणे असे म्हणतात. या धोरणांच्या साहाय्याने सरकार आपली पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी, आर्थिक स्थैर्य, किंमत स्थैर्य इत्यादी विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. थोडक्यात समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण आणि परकीय व्यापार धोरण या समग्रलक्षी आर्थिक धोरणांची अंमलबजावणी सरकारकडून केली जाते. विविध समग्रलक्षी आर्थिक धोरणांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

१) चलनविषयक धोरण (Monetary Policy) **:**

सरकारच्या मालकीची असणारी मध्यवर्ती बँक चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे काम करते. चलननिर्मिती करण्याचे काम देशाची मध्यवर्ती बँक करत असते. पैशाचा पुरवठा कमी किंवा जास्त झाला तर त्याचे अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतात. हे दुष्परिणाम होणार नाहीत याची काळजी मध्यवर्ती बँकेला घ्यावी लागते. म्हणून चलन निर्माण करण्याबरोबरच चलन पुरवठ्याचे (पैशाच्या पुरवठ्याचे) योग्य व्यवस्थापनही मध्यवर्ती बँकेला करावे लागते. चलनपुरवठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी मध्यवर्ती बँक विविध उपाय योजते. त्यालाच चलनविषक धोरण (द्रव्यनीती) असे म्हणतात. चलनविषयक धोरणाची एक साधी, सोपी व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''पूर्ण रोजगार, किंमत स्थैर्य इत्यादी विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठ्यात आणि व्याजदरात जाणीवपूर्वक केलेले बदल म्हणजे चलनविषयक धोरण किंवा द्रव्यविषयक धोरण होय.''

अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार मध्यवर्ती बँकेला पैशाच्या पुरवठ्यात योग्य ते बदल करावे लागतात. म्हणजेच पैशाच्या पुरवण्याचे व्यवस्थापन करावे लागते. सरकारच्या वतीने चलनपुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम मध्यवर्ती बँकेला करावे लागते. आर. पी. केंट यांनी चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्यासाठी पैशाच्या पुरवठ्याचे जे व्यवस्थापन करावे लागते त्यास चलनविषयक धोरण असे म्हणतात.''

देशाच्या मध्यवर्ती बँकेला चलन छपाईचा जसा अधिकार असतो तसाच चलनाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचा सुद्धा अधिकार असतो. त्यासाठी मध्यवर्ती बँक काही उपाय योजते. उदाहरणार्थ, व्याजदरात वाढ

करून पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी. या उपायांनाच चलनविषयक धोरण (Monetary Policy) असे म्हणतात.

प्रा. विरिग्समन (Wrightsman) यांनी चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''विविध आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न म्हणजे चलनविषयक धोरण होय.'' (The deliberate effort by the central bank to control the money supply and credit condition for the purpose of achieving certain broad economic objectives.)

चलनविषयक धोरणाची उद्दिष्टे :

विकसित देश, अविकसित देश आणि विकसनशील देश असे तीन प्रकारचे देश जगात आढळून येतात. या तिन्ही प्रकारच्या देशांच्या चलनविषयक धोरणाची काही उद्दिष्टे सारखी आहेत तर काही उद्दिष्टे वेगळी आहेत. मध्यवर्ती बँकेच्या चलनविषयक धोरणाची काही ठळक उद्दिष्टे अशी आहेत - १) पैसा तटस्थ ठेवणे २) आर्थिक विकास ३) आर्थिक वृद्धी ४) पूर्ण रोजगार ५) व्यापारचक्रांचे निमंत्रण ६) सर्वसाधारण किंमत पातळीत स्थैर्य प्रस्थापित करणे ७) विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे.

चलनविषयक धोरणाची साधने :

आजच्या गतिमान अर्थव्यवस्थेत म्हणजेच ज्या अर्थव्यवस्थेत पैशाचा वापर प्रचंड प्रमाणावर केला जातो त्या अर्थव्यवस्थेत चलनविषयक धोरणाला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. चलनविषयक धोरणाची विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँक जे विविध उपाय योजते, त्यास चलनविषयक धोरणाची साधने (Measures or weapons of Monetary Policy) असे म्हणतात. अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा नियंत्रित करण्यासाठी मध्यवर्ती बँक ज्या साधनांचा अवलंब करते, त्या साधनांना चलनविषयक धोरणाची साधने असे म्हणतात. पैशाचा पुरवठा फारच कमी झाला तर अर्थव्यवस्थेत आर्थिक मंदी निर्माण होते. त्यामुळे मंदी नाहीशी करण्यासाठी मध्यवर्ती बँकेला पैशाच्या पुरवठ्यात योग्य प्रमाणात वाढ होईल, असे उपाय योजावे लागतात. तसेच पैशाचा पुरवठा अर्थव्यवस्थेत गरजेपेक्षा जास्त झाल्यास तेजी (भाववाढ) निर्माण होते. त्यामुळे तेजी आटोक्यात आणण्यासाठी मध्यवर्ती बँकेला चलनविषयक साधने वापरावी लागतात. अशा प्रकारे पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम मध्यवर्ती बँकेला करावे लागते. मध्यवर्ती बँक आपल्या चलनविषयक साधनांचा वापर करून पैशाचा पुरवठा कमी-जास्त करते. त्यास चलनविषयक धोरण असे म्हणतात. चलनविषयक धोरणाची (पैशाच्या पुरवठ्याच्या नियंत्रणाची) (अ) संख्यात्मक साधने आणि (ब) गुणात्मक साधने अशी दोन साधने आहेत. संख्यात्मक साधनामध्ये - १. बँक दर धोरण. २. खुल्या बाजारात कर्जरोख्यांची खरेदी-विक्री. ३. रोख राखीव निधीचे प्रमाण या तीन साधनांचा समावेश होतो. या तीन साधनांचा वापर करून मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेला गरजेइतका पैशाचा पुरवठा करते. त्यामुळे उत्पादन, उत्पन्न, नफा, गुंतवणूक, रोजगार यामध्ये वाढ होऊन आर्थिक विकासाला गती मिळते. चलनविषयक धोरणाच्या गुणात्मक साधनामध्ये (१) कर्जाचे नियंत्रित वाटप. (२) तारण व कर्ज यातील गाळा/ अंतर. (३) उपभोग्य कर्जावर नियंत्रण. (४) नैतिक समजावणी. (५) प्रत्यक्ष कारवाई. (६) प्रसिद्धी या साधनांचा समावेश होतो. पतनियंत्रणाच्या गुणात्मक साधनांना वेचक साधने

किंवा निवडक साधने असे म्हणतात. संख्यात्मक साधनांच्या वापराने अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा कमी–जास्त करता येतो. गुणात्मक साधनांच्या वापराने पैशाच्या पुरवठ्यात कमी किंवा जास्त बदल करता येत नाही. परंतु या साधनांचा वापर करून पैसा योग्य कामासाठी (उत्पादक कामासाठी) वळवता येतो. त्यामुळे विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे पतनियंत्रणाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक साधनांचा अवलंब करून मध्यवर्ती बँक पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य, विनिमय दर स्थैर्य ही समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते.

२) राजकोषीय धोरण (Fiscal Policy) **:**

चलनविषयक धोरणाप्रमाणे राजकोषीय धोरण हे एक प्रमुख समग्रलक्षी आर्थिक धोरण आहे. राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी देशाचे केंद्र सरकार करते. राजकोषीय धोरणाची एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य इत्यादी विविध आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारने आपल्या कर, खर्च, कर्ज आणि अंदाजपत्रकीय धोरणात केलेले बदल म्हणजे राजकोषीय धोरण होय.''

आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य, पूर्ण रोजगार ही विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज आणि अंदाजपत्रक या राजकोषीय साधनांचा एकत्रितरित्या उपयोग केला जातो. राजकोषीय धोरणालाच राजवित्तीय धोरण असेही म्हणतात. प्रा. हार्वे यांनी राजकोषीय धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''आर्थिक विकासासाठी सरकारी कर धोरणात आणि सरकारी खर्च धोरणात जे योग्य ते बदल केले जातात त्यास राजवित्तीय धोरण असे म्हणतात.''

राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे :

केंद्र सरकारच्या राजकोषीय धोरणाची प्रमुख उद्दिष्टे अशी आहेत – (१) संतुलित आर्थिक विकास (२) बेरोजगारी कमी करणे (३) आर्थिक विषमता कमी करणे (४) किंमत स्थैर्य (५) उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर करणे (६) पायाभूत सुविधांत वाढ करणे (७) स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) वाढ घडवून आणणे इत्यादी.

राजकोषीय धोरणाची साधने :

राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने सरकार विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते. (१) कर (२) सार्वजनिक खर्च (३) सार्वजनिक कर्ज (४) अंदाजपत्रक ही चार राजकोषीय धोरणाची साधने आहेत. या साधनात योग्य ते बदल करून केंद्र सरकार आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य इत्यादी समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते.

३) विदेशी व्यापार धोरण (Foreign Trade Policy) **:**

परकीय व्यापार धोरण हे एक प्रमुख समग्रलक्षी आर्थिक धोरण आहे. विदेशी व्यापार धोरणालाच परकीय

व्यापार धोरण किंवा परराष्ट्रीय व्यापार धोरण असे म्हणतात. आयात व्यापार आणि निर्यात व्यापार असे परकीय व्यापाराचे दोन प्रकार आहेत. सरकारच्या आयात आणि निर्यात व्यापारविषयक धोरणाला विदेशी व्यापार धोरण असे म्हणतात. मुक्त व्यापार धोरण आणि संरक्षित व्यापार धोरण असे विदेशी व्यापार धोरणाचे दोन प्रकार आहेत.

मुक्त व्यापार धोरण (Free Trade Policy) **:**

मुक्त व्यापार धोरणालाच खुल्या व्यापाराचे धोरण असेही म्हणतात. ज्या देशाच्या व्यापार धोरणात आयात-निर्यात व्यापारावर कोणतीही बंधने नसतात त्या व्यापार धोरणास मुक्त व्यापाराचे धोरण किंवा खुल्या व्यापाराचे धोरण असे म्हणतात. मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारलेले देश आयात-निर्यातीवर कोणतीही बंधने (निर्बंध/नियंत्रणे) टाकत नाहीत. मुक्त व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्णपणे खुला असणे होय. जसा देशांतर्गत व्यापार चालतो तसा आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो. परकीय व्यापारात सरकार फारसा हस्तक्षेप करत नाही. अ‍ॅडम स्मिथ यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय व्यापारात देशी वस्तू आणि परदेशी वस्तू असा भेद नसणे आणि विदेशी मालावर जकाती बसवून स्वदेशी मोलास संरक्षण देणे असे धोरण नसणे म्हणजे मुक्त व्यापाराचे धोरण होय.''

मुक्त व्यापार धोरणाचे काही फायदे मिळतात. उदाहरणार्थ, (१) विदेशातून दुर्मिळ वस्तू मिळवता येतात. (२) देशात टंचाई असणाऱ्या वस्तू विदेशातून आणता येतात. त्यामुळे वस्तूंचा तुटवडा कमी होतो. भाववाढ रोखता येते, (३) ज्या वस्तूचा उत्पादन खर्च कमी येतो त्या वस्तूंचे उत्पादन देश करतो. त्यामुळे उत्पादन कमी खर्चात होते आणि उत्पादनातही वाढ होते. (४) मुक्त व्यापारामुळे सेवा क्षेत्राची प्रगती घडून येते. (५) देशाला आवश्यक असणारी यंत्रसामग्री, सिमेंट, लोखंड परदेशातून आयात करता येते. त्यामुळे देशाचा विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. (६) आयात-निर्यात व्यापारावर निर्बंध नसतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. जगाचा व्यापार वाढतो. (७) मुक्त व्यापार धोरणामुळे निर्यात वाढते. त्यामुळे एकूण जागतिक उत्पादनात वाढ होते. (८) देशातील ग्राहकांना हव्या त्या विदेशी वस्तू मिळतात. त्यामुळे त्यांच्या समाधानात (संतोषाधिक्यात), राहणीमानाच्या दर्जात वाढ होते. (९) खुल्या व्यापार धोरणामुळे सर्व देशांना श्रमविभागणीचे फायदे मिळतात (१०) खुल्या व्यापार धोरणामुळे देशात विशिष्ट व्यापाऱ्यांची मक्तेदारी वाढत नाही. (११) देशी उद्योगांची स्पर्धाशक्ती वाढते. देशी उद्योजक विदेशी वस्तूंच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी वस्तूचा दर्जा व गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न करतात. (१२) खुल्या व्यापार धोरणामुळे जागतिक सहकार्य वाढते. एकमेकांना सहकार्य करण्याची प्रवृत्ती वाढते. (१३) खुल्या व्यापार धोरणामुळे गरीब देशांना विदेशी तंत्रज्ञान उपलब्ध होते.

खुल्या व्यापार धोरणाचे जसे काही फायदे आहेत तसेच काही तोटे सुद्धा आहेत. (१) खुल्या व्यापाराचा गरीब देशांना कमी लाभ मिळतो आणि प्रगत देशांना जास्त लाभ मिळतो. कारण गरीब देशांची निर्यात खूपच कमी असते. (२) विकसित देशातील चांगल्या वस्तू गरीब देशात आल्यामुळे देशी वस्तूंचा खप कमी होतो. लघु आणि कुटिर उद्योग बंद पडतात. (३) खुल्या व्यापार धोरणामुळे एका देशातील तेजी व मंदी दुसऱ्या देशात पसरते. (४) खुल्या व्यापार धोरणामुळे परावलंबित्वात वाढ होते. वस्तूंच्या बाबतीत दुसऱ्या देशावर अवलंबून रहावे लागते. (५) दारू, गांजा, अफू अशा घातक वस्तूंचा व्यापार वाढतो. (६) खुल्या व्यापार धोरणामुळे राष्ट्राराष्ट्रात गळेकापू स्पर्धा वाढते. प्रगत देशांच्या स्पर्धेत गरीब देश टिकू शकत नाहीत.

संरक्षित व्यापार धोरण (Protected Trade Policy) **:**

संरक्षित व्यापार धोरणाची मांडणी सर्वप्रथम अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी १७९१ मध्ये केली. जर्मन अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्ट यांनी देखील या धोरणाचे समर्थन केले होते. खुल्या व्यापार धोरणात आयात व निर्यातीवर कोणतीही बंधने नसतात. तर संरक्षित व्यापार धोरणात आयात, निर्यातीवर अनेक बंधने असतात. स्वदेशातील उद्योगांना परकीय उद्योगापासून संरक्षण देण्यासाठी अनेक देश संरक्षणाचे व्यापार धोरण स्वीकारतात. ''परदेशातून आयात होणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर जकाती (कर) लादणे, आयात वस्तूंच्या प्रमाणावर (Quota) नियंत्रण ठेवणे, विशिष्ट वस्तूंची विशिष्ट प्रमाणात आयात करणे, काही वस्तूंच्या आयातीवर बंदी घालणे, स्वदेशी उद्योगांना विविध प्रकारची अनुदाने (आर्थिक सहाय्ये) देणे इत्यादी बाबी ज्या व्यापार धोरणात नमूद असतात त्या व्यापार धोरणास संरक्षित व्यापार धोरण असे म्हणतात.

संरक्षित व्यापार धोरणाचे काही फायदे आहेत. उदाहरणार्थ, (१) या धोरणामुळे देशातील रोजगारात वाढ होते. आयात बंदी असल्याने देशात उत्पादन वाढीस वाव असतो. अधिक उत्पादन करण्यासाठी अधिक उत्पादन घटक कामास घ्यावे लागतात. (२) संरक्षित व्यापार धोरणामुळे गरीब देशातील लघु व कुटिरउद्योग नाश पावत नाहीत. कारण विदेशातून वस्तू आयात केल्या जात नाहीत. (३) सरकारला आयात व निर्यात शुल्काच्या रुपाने उत्पन्न मिळते. त्यामुळे सरकारच्या उत्पन्नात वाढ होते. (४) संरक्षित व्यापार धोरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी होते. कारण भरमसाठ आयात केली जात नाही, (५) निर्यातीवर निर्बंध असल्याने नैसर्गिक साधनसामग्रीचा बेसुमार वापर होत नाही. (६) संरक्षित व्यापार धोरणामुळे देशाचे व्यापारचक्रापासून संरक्षण घेते. दुसऱ्या देशातील तेजी व मंदी आपल्या देशात येत नाही. (७) या धोरणामुळे माल खपवण्याची जीवघेणी स्पर्धा राष्ट्राराष्ट्रात निर्माण होत नाही. अवपूंजन करावे लागत नाही. (८) संरक्षित व्यापार धोरणामुळे देशाची निर्यात वाढते. (९) संरक्षित व्यापार धोरण हे नव्याने स्थापन झालेल्या (बाल्यावस्थेतील) लहान लहान उद्योगांना फायदेशीर आहे. (१०) संरक्षित व्यापार धोरणामुळे देशी उद्योग बंद पडत नाहीत. त्यामुळे रोजगारात वाढ होते. (११) संरक्षित व्यापार धोरणामुळे मूलभूत (पायाभूत) उद्योगांचा विकास होतो. (१२) या धोरणामुळे देशातील पैसा देशातच राहतो.

संरक्षित व्यापार धोरणाचे जसे काही फायदे आहेत तसेच काही तोटे सुद्धा आहेत. उदाहरणार्थ, (१) देशी उद्योगांना विदेशी वस्तूंशी स्पर्धा करावी लागत नाही. त्यामुळे त्यांची स्पर्धाशक्ती कमी होते. कामगारांची कार्यक्षमता वाढत नाही. (२) संरक्षित व्यापार धोरणामुळे जागतिक व्यापार फारसा वाढत नाही. (३) विदेशातील स्वस्त व चांगल्या दर्जाच्या वस्तू मिळत नाहीत. विदेशी वस्तूपासून नागरिकांना वंचित रहावे लागते. (४) देशी उद्योगांना विदेशी वस्तूशी स्पर्धा करावी लागत नाही. त्यामुळे कमी दर्जाचे उत्पादन तयार होते. (५) विदेशातून वस्तू आपण घेत नसल्याने देशी उद्योजक आपल्या वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढतात. (६) या धोरणाचा गरीब देशांच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. विदेशातून यंत्रे, उच्च दर्जाचे तंत्रज्ञान मिळत नाही. (७) संरक्षित व्यापार धोरणामुळे देशाचे इतर राष्ट्रांशी असणारे संबंध बिघडतात. (८) संरक्षित व्यापार धोरणाचा अधिक फायदा उपभोक्त्यापेक्षा उत्पादकांना होतो. त्यांच्या उत्पन्नात अधिक वाढ होते. त्यामुळे आर्थिक विषमता वाढते. (९) संरक्षित व्यापार धोरणामुळे भाववाढीला तोंड देता येत नाही. कारण विदेशातून वस्तू पुरेशा प्रमाणात आयात करता येत नाहीत. (१०) या धोरणामुळे देशाला श्रमविभागणीचे फायदे मिळत नाहीत.

❑❑❑

घटक ३

मिल्टन फ्रिडमन

मिल्टन फ्रिडमन यांचा दृष्टिकोन

(Milton Friedman's Approach)

प्रास्ताविक :–

पैशाचे मूल्य कसे निश्चित होते? किंवा पैशाचे मूल्य कोणत्या घटकांवर अवलंबून असते? या संदर्भात विविध अर्थतज्ज्ञांनी विविध विचार मांडले आहेत. आपले विचार त्यांनी सिध्दांतांच्या आणि गणिती समीकरणांच्या स्वरुपात मांडले आहेत. काहींनी पैशाचे मूल्य हे पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असते असे म्हटले आहे. तर काहींनी पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणीवर अवलंबून असते असे म्हटले आहे. तर काहींनी पैशाचे मूल्य हे पैशाची मागणी व पैशाच्या पुरवठयावर अवलंबून असते असे म्हटले आहे. आयर्व्हिंग फिशर यांनी पैशाच्या मूल्यासंबंधी जो सिध्दांत मांडला आहे, त्याला चलनसंख्यामान सिध्दांत (Quantity Theory of Money) असे म्हणतात. केन्स व इतरांनी या सिध्दांतावर टीका केली. त्यांनी पैशाचे मूल्य कसे ठरते? हे स्पष्ट करण्यासाठी रोख शिल्लक दृष्टिकोन (Cash Balance Approach) मांडला यालाच 'केंब्रिज दृष्टिकोन' किंवा 'केंब्रिज समीकरणे' असेही म्हणतात. पैशाच्या मूल्यासंबंधी आणखी एक महत्वाचा सिध्दांत आहे, आणि तो म्हणजे 'पैशाच्या मूल्याचा उत्पन्न सिध्दांत' (Income Theory of Money) होय. मिल्टन फ्रिडमन यांनी सुध्दा पैशाच्या मूल्यासंबधी आपले विचार सिध्दांताच्या/काही समीकरणांच्या रुपात मांडले आहेत. त्याची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

मिल्टन फ्रिडमन यांचा सिध्दांत :–

मिल्टन फ्रिडमन हे नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ आहेत. १९५६ मध्ये प्रसिध्द केलेल्या ग्रंथात त्यांनी चलनसंख्यामान सिध्दांताची मांडणी केली आहे. फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात लोक पैशाची मागणी का करतात? किंवा देशातील लोक स्वत:जवळ पैसा का ठेवतात? त्याची चर्चा केली आहे. पैशाच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या घटकांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

संपत्तीचे पाच प्रकार :–

मिल्टन फ्रिडमन यांनी संपत्ती पाच प्रकारची असते, असे म्हटले आहे. पैशाची मागणी ही लोकांजवळ असलेली वेगवेगळ्या प्रकारची संपत्ती, त्या संपत्तीची किंमत व संपत्तीपासून मिळणारे उत्पन्न इत्यादी घटकावर अवलंबून असते. संपत्तीचे पाच प्रकार खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) पैसा (M)

२) बॉण्डस (B)

३) शेअर्स (E)

४) भौतिक वस्तू (G)

५) मानवी संपत्ती/मानवी भांडवल (H)

फ्रिडमन यांच्या मते, संपत्तीच्या विविध प्रकारापासून लोकांना उत्पन्न मिळत असते. म्हणून लोक संपत्ती जवळ बाळगतात. मात्र, संपत्तीच्या प्रत्येक प्रकारापासून लोकांना सारखेच उत्पन्न मिळत नाही. मिळणारे उत्पन्न वेगवेगळे असते.

१) पैसा (Money-M) :-

फ्रिडमन यांच्या मते लोक पैशाला संपत्ती किंवा मालमत्ता असे समजतात. पैसा हा संपत्तीचा एक महत्वाचा प्रकार आहे. अधिक उत्पन्न मिळावे म्हणून लोक बँकेत आपले पैसे ठेव म्हणून ठेवतात. त्या पैशावर किंवा ठेवीवर लोकांना बँकेकडून व्याजाच्या स्वरुपात उत्पन्न मिळत असते. बँका व्याज देतात म्हणून लोक आपले पैसे बँकेत ठेवतात. त्याला बचत असे म्हणतात. याला पैशाचा परतावा असेही म्हणतात. व्यक्तीने बँकेत ठेवलेल्या ठेवीवर व्यक्तीला व्याजाच्या स्वरुपात जे अधिकचे उत्पन्न मिळते, त्या उत्पन्नास परतावा असे म्हणतात. बँका एका निश्चित दराने बचत ठेवीवर व्याज देत असतात. विशिष्ट काळासाठी त्यात बदल होत नाही. लोकांनी विशिष्ट मुदतीसाठी आपला पैसा बँकेत ठेव म्हणून ठेवला आणि व्याज किंवा परतावा मिळण्याच्या वेळेस विविध वस्तू व सेवा यांच्या किंमतीत वाढ झाली तर लोकांचा तोटा होतो. कारण किंमतपातळीत वाढ झाल्याने पैशावर (ठेवीवर) मिळालेले व्याज कमी वाटते. वास्तव परतावा कमी वाटतो. किंमत पातळीत वाढ झाल्याने देशात महागाईची किंवा भाववाढीची परिस्थिती निर्माण होते. वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्याने पैशाची खरेदीशक्ती म्हणजेच पैशाचे मूल्य कमी होते. अशा प्रकारे वस्तू व सेवांच्या किंमतीत (सर्वसाधारण किंमतपातळीत) वाढ झाल्याने पैशाची किंमत (पैशाचे मूल्य) घटते. त्यामुळे परतावा (व्याज) मिळवण्यासाठी ज्यांनी बँकेत पैसे (ठेव) ठेवलेले असतात, त्यांचे वस्तूंच्या किंमतीत झालेल्या वाढीने नुकसान होते. म्हणजेच तोटा होतो. हा तोटा बँकेतून पैशावर जे व्याज मिळते, त्यातून वजा केला पाहिजे. समजा जर वस्तू व सेवांच्या किंमतीत (सर्वसाधारण किंमत पातळीत) घट झाली तर देशात स्वस्ताईची परिस्थिती निर्माण होते. वस्तूंच्या किंमती घटल्याने पैंशाची किंमत (पैशाचे मूल्य) वाढते. त्यामुळे बँकेत पैसा (ठेव) ठेवलेल्या व्यक्तींचा फायदा होतो. पैशाचे मूल्य वाढलेले असल्याने त्यांना परतावा (व्याज) ज्यास्त मिळाल्यासारखे वाटते. अशा प्रकारे सर्वसाधारण किंमत पातळीत जी वाढ किंवा घट होते, त्यामुळे पैशाच्या मूल्यात बदल होतो. बँका लोकांना त्यांच्या पैशावर (ठेवीवर) जो परतावा (व्याज) देतात, तो वस्तूंच्या किंमतीशी संबंधित असतो.

२) बॉण्डस (B) :-

फ्रिडमन यांनी 'बॉण्डस' हा संपत्तीचा किंवा मालमत्तेचा दुसरा प्रकार सांगितला आहे. लोक बॉण्डसकडे संपत्तीचे किंवा मालमत्तेचे साधन म्हणून पाहतात. बॉण्डसमध्ये पैसे गुंतवल्याने पैशाच्या स्वरुपात परतावा (जादा उत्पन्न) मिळते. बॉण्डसमधील गुंतवणूकीमुळे लोकांना व्याजाच्या स्वरुपात उत्पन्न मिळते. म्हणून लोक आपला

पैसा बॉण्डस्‌मध्ये गुंतवतात. बॉण्डसमधील गुंतवणूकीमुळे परतावा मिळत असल्याने फ्रिडमन यांनी बॉण्डसला संपत्ती किंवा मालमत्ता (जिंदगी) असे मानले आहे.

३) शेअर्स (भाग–Shares-E) :-

फ्रिडमन यांनी 'शेअर्स' हा संपत्तीचा किंवा मालमत्तेचा तिसरा प्रकार सांगितला आहे. कंपन्यांचे शेअर्स (भाग) खरेदी केल्यामुळे लोकांना कंपन्यांच्या नफ्यात काही वाटा मिळतो. त्याला लाभांश (dividend) असे म्हणतात. या लाभांशालाच शेअर्समध्ये केलेल्या गुंतवणूकीबद्दल मिळणारा परतावा असे म्हणतात. अशा प्रकारे कंपन्यांच्या शेअर्समध्ये केलेल्या गुंतवणूकीमुळे भागधारकांना लाभांशाच्या स्वरुपात उत्पन्न मिळत असल्याने शेअर्समध्ये केलेल्या गुंतवणूकीला मालमत्ता किंवा संपत्ती असे म्हणतात. शेअर्समधील गुंतवणूकीमुळे किंवा कंपन्यांचे शेअर्स खरेदी केल्यामुळे लाभांश (परतावा) मिळत असल्याने ङ्गशेअर्सफ किंवा शेअर्स खरेदी हा उत्पन्नाचा मार्ग आहे असे म्हटले आहे.

४) भौतिक वस्तू (G) :-

'भौतिक वस्तू' हा संपत्तीचा किंवा मालमत्तेचा आणखी एक प्रकार मिल्टन फ्रिडमन यांनी सांगितला आहे. लोक ज्याप्रमाणे बॉण्डसमध्ये, शेअर्स खरेदीत पैसे गुंतवतात त्याप्रमाणे भौतिक वस्तूमध्ये किंवा टिकावू वस्तूमध्ये सुध्दा पैसे गुंतवतात. लोक भौतिक वस्तू (टिकावू वस्तू) खरेदी करुन त्या वस्तूंचा साठा करुन ठेवतात. भौतिक वस्तूंच्या (टिकावू वस्तूंच्या) साठ्यापासून परतावा उत्पन्न मिळत असल्याने लोक अशा वस्तूंच्या खरेदीत पैसे गुंतवत असतात. म्हणजेच अशा टिकावू वस्तू विकत घेऊन त्यांची साठवणूक करत असतात. अशा प्रकारे भौतिक किंवा टिकावू वस्तूंचा साठा केल्याने त्यापासून उत्पन्न मिळत असल्याने भौतिक किंवा टिकावू वस्तूंना संपत्ती किंवा मालमत्ता मानण्यात आले आहे.

५) मानवी भांडवल (H) :-

फ्रिडमन यांनी ङ्गमनुष्यफही संपत्ती मानली आहे. मनुष्य किंवा मानवी भांडवल हा संपत्तीचा/ मालमत्तेचा पाचवा प्रकार फ्रिडमन यांनी सांगितला आहे. राष्ट्राच्या आर्थिक विकासाला सहाय्यभूत ठरणाऱ्या बुध्दिमान व्यक्तींना मानवी भांडवल असे म्हणतात. संशोधक, शास्त्रज्ञ, कलावंत, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, विचारवंत, शिक्षक, प्राध्यापक, अभियंते, डॉक्टर्स या बुध्दिजीवी व्यक्तींना मानवी भांडवल असे म्हणतात. ज्ञान, शिक्षण, प्रशिक्षण, विविध कौशल्ये आणि अनुभव असणाऱ्या व्यक्तींना इतरांपेक्षा अधिक उत्पन्न मिळते म्हणून अशा व्यक्तींना मानवी संपत्ती किंवा मानवी भांडवल असे म्हणतात. म्हणून चांगले शिक्षण, प्रशिक्षण घेतलेल्या व तज्ज्ञ व्यक्तींना उत्पन्न मिळवून देणारे साधन किंवा संपत्ती अथवा मालमत्ता असे म्हणतात. अशा प्रकारे चांगले मनुष्यबळ म्हणजे एक प्रकारची संपत्ती किंवा मालमत्ताच असते. उदाहरणार्थ मजुरापेक्षा डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, यांना अधिक उत्पन्न मिळते. म्हणून लोक डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, संशोधक बनण्यासाठी खर्च करत असतात किंवा पैशाची गुंतवणूक करत असतात.

अशा प्रकारे मिल्टन फ्रिडमन यांनी पैसा (M), बॉण्डस (B), शेअर्स (E), भौतिक/टिकावू वस्तू (G), मानवी भांडवल (H) इत्यादींना संपत्ती किंवा मालमत्ता मानले आहे. संपत्तीच्या या पाच प्रकारापासून लोकांना परतावा (उत्पन्न) मिळत असते. म्हणून लोक ही पाच प्रकारची संपत्ती धारण करतात असे फ्रिडमन यांनी म्हटले आहे.

पैशाच्या मागणीवर परिणाम करणारे घटक किंवा पैशाची मागणी निश्चित करणारे घटक :-

मिल्टन फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात लोक पैशाची मागणी का करतात? किंवा लोक पैसा जवळ का बाळगतात? त्याची माहिती दिली आहे. तसेच पैशाच्या मागणीवर कोणत्या घटकांचा परिणाम होतो? त्याचीही माहिती दिली आहे. फ्रिडमन यांच्या मते, वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी लोकांना पैशाची गरज असते. म्हणून लोक पैशाची मागणी करतात. त्यांच्या मते, लोक पैसा हा संपत्तीचा एक प्रकारच समजतात. त्यामुळे लोक पैसा जवळ बाळगतात. म्हणजेच पैशाची मागणी करतात. थोडक्यात पैशाची मागणी ही लोकांजवळ असलेली वेगवेगळया प्रकारच्या संपत्ती, त्या संपत्तीची किंमत व त्या संपत्तीपासून मिळणारे उत्पन्न इत्यादी घटकावर अवलंबून असते.

पैशाच्या अंगी खरेदीशक्ती (Purchasing Power) हा गुणधर्म असतो. पैशाच्या साहाय्याने वस्तू व सेवा खरेदी करता येतात. म्हणून लोक पैशाची मागणी करतात किंवा पैसा स्वत:जवळ साठवतात. फ्रिडमन यांनी पैशाला संपत्ती किंवा मालमता मानले आहे. लोक आपली काही जिंदगी किंवा मालमत्ता पैशाच्या स्वरुपात ठेवतात. ज्याप्रमाणे उपभोग्य वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी लोक (ग्राहक) पैशाची मागणी करतात (पैसा जवळ बाळगतात), त्याप्रमाणे उत्पादक वस्तू व सेवा निर्माण करण्यासाठी भांडवली वस्तू विकत घेण्यासाठी पैशाची मागणी करतात. उपभोग्य वस्तू तयार करण्यासाठी यंत्रे, अवजारे, कारखान्याची इमारत इत्यादी भांडवली वस्तू आवश्यक असतात. या भांडवली वस्तू खरेदी करण्यासाठी उत्पादक वर्गाकडून पैशाची मागणी केली जाते. अशा प्रकारे लोक (ग्राहक व उत्पादक) पैशाची मागणी का करतात? त्याचे स्पष्टीकरण फ्रिडमन यांनी वरीलप्रमाणे दिले आहे. उपभोग्य आणि भांडवली वस्तू विकत घेण्यासाठी लोक (ग्राहक व उत्पादक) पैशाची मागणी करतात किंवा पैसे जवळ बाळगतात, असे फ्रिडमन म्हणतात.

फ्रिडमन यांनी पैशाची मागणी प्रभावित करणारे काही घटक खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. यालाच पैशाची मागणी निश्चित करणारे घटक असे म्हणतात.

१) वास्तव उत्पन्न :-

फ्रिडमन यांच्या मते, पैशाची मागणी ही वास्तव उत्पन्नावर अवलंबून असते. लोकांच्या वास्तव उत्पन्नात वाढ झाल्यास लोकांची वस्तू व सेवांची (खरेदी व्यवहारांची संख्या) मागणी वाढते. आणि लोकांच्या वास्तव उत्पन्नात घट झाल्यास लोकांची वस्तू व सेवांना असणारी मागणी कमी होते. म्हणजेच त्यांची खरेदी व्यवहारांची संख्या कमी होते. अशा प्रकारे लोकांच्या उत्पन्नावर लोकांची वस्तू व सेवांची मागणी अवलंबून असते. वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी लोकांना पैसा हवा असतो. म्हणून लोक पैशाची मागणी करत असतात. परंतु वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी लोकांची पैशाची जी मागणी असते, ती त्यांच्या वास्तव उत्पन्नावर अवलंबून असते. लोकांचे वास्तव उत्पन्न जास्त असेल तर पैशाला मागणी ज्यास्त राहते आणि लोकांचे वास्तव उत्पन्न कमी असेल तर पैशाची मागणी कमी राहते. कारण उत्पन्न कमी असल्याने लोक ज्यास्त प्रमाणात वस्तू व सेवा विकत घेऊ शकत नाहीत. म्हणून ते पैशाची मागणी कमी करतात. अशा प्रकारे पैशाची मागणी ही लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. वस्तू व सेवा पैशाच्या सहाय्याने खरेदी करता येतात. म्हणून लोक पैसा जवळ बाळगतात किंवा पैशाची मागणी करतात. फ्रिडमन म्हणतात, लोकांच्या वास्तव उत्पन्नात जेवढी वाढ होते त्यापेक्षा

अधिक वाढ पैंशाच्या मागणीत होते. अशा प्रकारे वास्तव उत्पन्न आणि पैशाची मागणी या दोन घटकात धन सहसंबंध असतात हे वरील स्पष्टीकरणावरुन आपल्या लक्षात येते. म्हणजे ज्या दिशेने उत्पन्नात बदल होतो. त्या दिशेने पैशाच्या मागणीत बदल होतो.

२) सर्वसाधारण किंमतपातळी (GPL) :-

सर्वसाधारण किंमत पातळी ही अशी एक किंमत असते की, जी सर्व (अनेक) वस्तूंच्या किंमतींची बेरीज करुन आलेल्या संख्येला सर्व वस्तूंच्या संख्येने भागून काढलेली असते. अनेक वस्तूंच्या किंमतींची बेरीज भागिले सर्व वस्तुंची संख्या = जी किंमत येईल, त्या किंमतीला सर्वसाधारण किंमत पातळी असे म्हणतात. या सर्वसाधारण किंमत पातळीत जर वाढ झाली तर पैशाच्या मूल्यात घट होते. वस्तूंच्या किंमतीत वाढ होणे म्हणजे पैशाचे मूल्य घटणे होय. सर्वसाधारण किंमत पातळीत वाढ झाली की, पैशाची खरेदीशक्ती कमी होते. त्यामुळे वस्तूंच्या किमत पातळीत वाढ होण्यापूर्वी पैशाच्या साहाय्याने जेवढ्या वस्तू व सेवा मिळत होत्या त्यापेक्षा कमी वस्तू सेवा तेवढयाच पैशात किंमत पातळीत वाढ झाल्यानंतर मिळतात. अशा प्रकारे किंमत पातळीत वाढ झाली की, पैशाची खरेदीशक्ती म्हणजेच पैशाचे मूल्य घटते. याऊलट सर्वसाधारण किंमत पातळीत घट झाल्यास पैशाच्या मूल्यात वाढ होते. कारण वस्तू व सेवा यांच्या किंमतीतील घटीमुळे तेवढयाच पैशात पूर्वीपेक्षा अधिक वस्तू व सेवा विकत मिळतात. म्हणजेच पैशाची खरेदीशक्ती वाढते. पैशाची खरेदीशक्ती वाढणे म्हणजेच पैशाचे मुल्य वाढणे होय. सर्वसाधारण किंमतपातळी घटली की पैशाचे मूल्य वाढते. अशा प्रकारे सर्वसाधारण किंमतपातळी आणि पैशाचे मूल्य यांच्यात परस्परविरुध्द संबध असतात.

३) व्याजदर :–

व्याजाच्या दराचाही पैशाच्या मागणीवर परिणाम होत असतो. व्याजदर आणि पैशाची मागणी यांच्यात व्यस्त (ऋण) सहसंबंध असतात. व्याजदरात वाढ झाली की पैशाची मागणी कमी होते आणि व्याज दरात घट झाल्यास पैशाची मागणी वाढते. लोक वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी पैशाची मागणी करत असतात. मात्र व्याजाचे दर अधिक असतील तर व्याजाच्या रुपाने अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी लोक व्याज देणाऱ्या साधनात अधिक गुंतवणूक करतात. त्यामुळे वस्तू व सेवा यांच्या खरेदीसाठी जी पैशाची मागणी असते, ती कमी होते. व्याज मिळवण्यासाठी पैशाची गुंतवणूक केली जाते. याउलट व्याज दरात घट झाली तर लोकांची व्याज देणाऱ्या साधनातील गुंतवणूक कमी होते आणि ते वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी पैशाची अधिक मागणी करतात. अशा प्रकारे व्याज दरात वाढ झाल्यास पैशाची मागणी कमी होते. याउलट व्याजदरात घट झाल्यास पैशाच्या मागणीत वाढ होते.

४) किंमतीतील बदलांचा दर :–

किंमतीत होणारी मोठी वाढ आणि किंमतीत होणारी फार मोठी घट या बाबींचाही पैशाच्या मागणीवर परिणाम होत असतो. वस्तूंच्या किंमतीत फार मोठ्या दराने वाढ होत असेल तर पैशाला मागणी कमी राहते. याउलट वस्तुंच्या किंमतीत फार मोठ्या दराने घट होत असेल तर पैशास मागणी कमी राहते.

अशा प्रकारे पैशाच्या मागणीवर वरील घटकांचा परिणाम होत असतो. वास्तव उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी, व्याजदर, किंमतीतील बदलांचा दर हे पैशाची मागणी निश्चित करणारे घटक आहेत. या घटकावर पैशाची मागणी अवलंबून असते. त्याची चर्चा वरती केली आहे.

पैशाच्या मागणीचे फलन

मिलटन फ्रिडमन यांनी पैशाच्या मागणीचे फलन खालीलप्रमाणे दिले आहे.

$M = f(P, Y, \frac{1}{p}\frac{dp}{dt}, rb, re, w, u) - 1$

वरील समीकरणातील इंग्रजी अक्षरांचा मराठीत अर्थ खालीलप्रमाणे दिला आहे.

M = पैशाची मागणी

f = कार्यात्मक संबंध (functional relationship)

P = सर्वसाधारण किंमत पातळी

Y = एकूण उत्पन्न

$\frac{1}{p}\frac{dp}{dt}$ = किंमतीतील बदलाचा अपेक्षित दर

rb = बॉण्डवरील व्याज दर

re = शेअर्सपासून मिळणारे उत्पन्न

w = अमानवी अथवा भौतिक संपत्तीचे मानवी संपत्तीशी गुणोत्तर

u = आवडी, निवडी

पैशाची मागणी आणि सर्वसाधारण किंमत पातळी, एकूण उत्पन्न, किंमतीतील बदलांचा अपेक्षित दर, बॉण्डवरील व्याज दर, शेअर्सपासून मिळणारे उत्पन्न, भौतिक संपत्तीचे मानवी संपत्तीशी गुणोत्तर, आवडी, निवडी या घटकात फलनात्मक/कार्यात्मक संबंध असतात, असा वरील सुत्राचा अर्थ आहे. किंमतीत आणि उत्पन्नात बदल झाल्यास पैशाच्या मागणीतही बदल होतो असे वरील समीरकणावरुन स्पष्ट होते.

$M = (Y_p, h, r_m, r_b, \frac{\Delta P}{P} U)-2$

M = पैशाची मागणी

Y_p = कायम उत्पन्न

r_m = पैशावरील व्याज

r_b = बॉण्डच्या खरेदीवर (गुंतवणूकीवर) मिळणारा व्याजदर

r_e = शेअर्सच्या खरेदीवर मिळणारा लाभांश

$\frac{\Delta P}{P}$ = किंमत पातळीतील बदल

u = संस्थात्मक घटक

h = लोकांच्याकडे असलेल्या एकूण संपत्तीमधील मानवरुपी संपत्तीचे प्रमाण.

$M = f(Y_p, r) -3$

M = पैशाची मागणी

r = समीकरण क्रमांक २ मधील तीन व्याजदर एकत्र करुन एक व्याजदर केला आहे.

फ्रिडमन यांच्या सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :-

मिलटन फ्रिडमन यांच्या सिध्दांतावर प्रामुख्याने खालील प्रकारच्या टीका केल्या जातात. फ्रिडमन यांच्या सिध्दांतावर करण्यात येणाऱ्या टीका किंवा उणिवा किंवा दोष यांची चर्चा थोडक्यात खालीलप्रमाणे केली आहे.

१) वेळ/कालावधी (Time) या घटकाकडे दुर्लक्ष :-

फ्रिडमन यांच्या सिध्दांतातील एक उणिव म्हणजे त्यांनी आपल्या सिध्दांतात वेळ/कालावधी या घटकाचा विचार केलेला नाही. वेळ/कालावधी घटकांचा विचार न करता सिध्दांताची मांडणी केली आहे. त्यामुळे त्यांचा सिध्दांत दोषयुक्त आहे.

२) पैशाची अतिव्यापक व्याख्या :-

मिलटन फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात पैशाची अतिव्यापक व्याख्या केली आहे. अशी टीका टीकाकारांनी केली आहे. त्यांनी पैशात नोटा व नाणी याबरोबरच मागणी ठेवी आणि दार्घ मुदत ठेवी या ठेवींचाही समावेश केला आहे.

३) व्याजदराचा पैशाच्या मागणीवर होणारा परिणाम दुर्लक्षित :-

व्याजदरात बदल होत असतात आणि त्या बदलांचा परिणाम पैशाच्या मागणीवर मोठया प्रमाणात होत असतो. परंतु त्याचा विचार प्रा. फ्रिडमन यांनी आपला सिध्दांतात केलेला नाही अशी एक टीका टीकाकारांनी फ्रिडमन यांच्या सिध्दांतावर केलली आहे.

४) पैशाच्या इतर कार्याकडे दुर्लक्ष:-

वस्तु व सेवा विकत घेण्यासाठी लोक पैशाची मागणी करतात असे मिलटन फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात म्हटले आहे. पैसा वस्तू व सेवा विकत घेण्याचे जे कार्य करतो, त्या कार्याला पैशांच्या विनिमय माध्यमाचे कार्य असे म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते, पैसा केवळ विनिमय माध्यमाचे काम करत नाही. तर पैसा इतरही महत्वाची कार्ये करत असतो. परंतु त्या कार्याचा विचार फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात केलेला नाही. त्यामुळे हा सिध्दांत दोषयुक्त आहे. अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

५) मुदती ठेवींचा समावेश पैशात करणे चुकीचे :-

प्रा. मिलटन फ्रिडमन यांनी मुदत ठेवींचा समावेश पैशात केला आहे. परंतु हे चुकीचे आहे अशी टीका काही टीकाकारांनी केली आहे. कारण मुदत ठेवीमधील रक्कम (पैसे) मुदत संपल्याशिवाय ठेवीदारांना खर्चासाठी उपलब्ध होत नाही. म्हणून पैशात मुदत ठेवींचा समावेश करणे योग्य नाही.

६) उत्पादन, किंमती इत्यादी घटकाकडे दुर्लक्ष :-

फ्रिडमन यांच्या सिध्दांतातील आणखी एक उणिव म्हणजे त्यांनी आपल्या सिध्दांतात उत्पादन, किंमती इत्यादी घटकांकडे दुर्लक्ष केले आहे. टीकाकारांच्या मते, पैशाच्या पुरवठयावर वस्तूंच्या किंमती, उत्पादन इत्यादी

घटकांचा परिणाम होत असतो. परंतु त्याचा विचार फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात केलेला नाही. म्हणून फ्रिडमन यांचा सिध्दांत अपुरा व दोषयुक्त आहे.

समारोप

अशा प्रकारे मिल्टन फ्रिडमन यांच्या सिध्दांतावर वरीलप्रमाणे काही टीका केल्या जातात. फ्रिडमन यांच्या सिध्दांतावर जरी काही टीका केल्या जात असल्या तरी त्यांच्या सिध्दातांची उपयुक्तता कमी होत नाही. त्यांचा हा सिध्दांत पैशाच्या मूल्याशी, पैशाच्या मागणीशी संबंधित आहे. पैशाच्या मागणीवर कोणत्या घटकांचा परिणाम होतो? लोक पैशाची मागणी का करतात? किंवा पैसा स्वत:जवळ का बाळगतात? याची माहिती समीकरणांच्या साहाय्याने फ्रिडमन यांनी आपल्या सिध्दांतात दिली आहे. पैशाची मागणी ही लोकांजवळ असलेली वेगवेगळया प्रकारची संपत्ती, त्या संपत्तीची किंमत व त्या संपत्तीकडून मिळणारे उत्पन्न इत्यादी घटकांवर अवलंबून असते, हा फ्रिडमन यांचा विचार महत्वाचा आहे.

❑❑❑

घटक ४

प्रवेग

प्रवेग तत्त्व (Principle of Acceleration) :

प्रवेग तत्त्वालाच 'त्वरक तत्व' असेही म्हणतात. ही संकल्पना सर्वप्रथम प्रा. क्लार्क यांनी १९१७ साली मांडली. प्रवेगाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

प्रवेगाची व्याख्या :

''प्रवेग म्हणजे उपभोगातील बदलांचे गुंतवणूकीतील बदलांशी असलेले प्रमाण होय.''

उपभोगात बदल झाला की, त्याचा गुंतवणुकीवर काय परिणाम होतो हे प्रवेगावरून समजते. प्रवेगाची संकल्पना खालील सूत्राच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

$$e = \frac{\triangle I}{\triangle C}$$

$$\text{प्रवेग} = \frac{\text{गुंतवणूकीतील बदल}}{\text{उपभोगातील बदल}}$$

वरील समीकरणात

$\triangle I$ = गुंतवणुकीतील बदल (वाढ किंवा घट)

$\triangle C$= उपभोगातील बदल (वाढ किंवा घट)

वरील व्याख्येचा आणि सूत्राचा अर्थ असा की, समाजाच्या उपभोगात वाढ झाली की, गुंतवणूक पातळीत वाढ होते. कारण उपभोगात वाढ म्हणजेच वस्तूंच्या मागणीत वाढ. ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादक गुंतवणूक वाढवतात. याऊलट समाजाच्या उपभोगात घट झाली की, गुंतवणूक घटते

एका सोप्या उदाहरणाच्या सहाय्याने प्रवेगाची संकल्पना स्पष्ट करता येईल. समजा समाजाचा उपभोग ३०० कोटी रुपयांनी वाढला आणि त्यामुळे गुंतवणूकीत ६०० कोटी रूपयांनी वाढ झाल्यास या उदाहरणात प्रवेग खालीलप्रमाणे येईल.

$$\text{प्रवेग} = \frac{\text{गुंतवणूकीतील बदल}}{\text{उपभोगातील बदल}}$$

$$\therefore \text{प्रवेग} = \frac{\text{६०० कोटी रुपये}}{\text{३०० कोटी रुपये}}$$

∴ प्रवेग = २

प्रवेगाची कार्यवाही :

अर्थव्यवस्थेत प्रवेग कसे कार्य करतो ते पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करता येईत.

समजा उपभोग्य वस्तूंची मागणी १००० नगांची आहे. आणि भांडवल उत्पादन गुणोत्तर १:१० आहे. म्हणजे १००० उपभोग्य वस्तू तयार करण्यासाठी १०० यंत्रे लागतील. भांडवली वस्तूचे (यंत्राचे) आयुर्मान समजा १० वर्षे इतके आहे. उपभोग्य वस्तूंची मागणी दरवर्षी १००० नगांची असल्याने दरवर्षी १० यंत्रे लागतीत. समजा आता उपभोग्य वस्तूंच्या मागणीत १० टक्क्यांनी वाढ झाली तर ही मागणी ११०० नग इतकी होईल. वाढीव १०० नगांची मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादकांकडून १० यंत्रांना मागणी येईत. यंत्राचे आयुर्मान १० वर्षे गृहीत धरल्याने दरवर्षी १० यंत्र बसवावी लागतील, तसेच उपभोग्य वस्तूंची मागणी १० टक्क्यांनी वाढल्याने १० यंत्रे नव्याने लागतील, अशा प्रकारे दरवर्षी २० यंत्रांना मागणी येईल, म्हणजे उपभोग्य वस्तूंची मागणी १० टक्क्यांनी वाढल्यानंतर उत्पादकांकडून २० यंत्रांना मागणी येते. टक्केवारीच्या भाषेत २० यंत्रांना मागणी म्हणजे १०० टक्के मागणी होय. अशा प्रकारे उपभोग्य वस्तूंच्या मागणीत १० टक्के वाढ झाल्यास यंत्राच्या मागणीत १०० टक्क्यांनी वाढ होते. म्हणजेच उपभोग्य वस्तूंच्या मागणीत थोडीशी जरी वाढ झाली तरी यंत्रांच्या म्हणजे भांडवली वस्तूंच्या मागणीत मोठी वाढ होते. त्यामुळे यंत्रे निर्माण करणाऱ्या उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. या उदाहरणात उपभोग्य वस्तूंची मागणी १० टक्क्यांनी वाढल्यानंतर यंत्राची मागणी म्हणजेच गुंतवणूक १०० टक्क्यांनी वाढल्याने प्रवेग १० इतका येतो.

प्रवेग तत्वाची गृहीते :

१) उद्योगात अतिरिक्त उत्पादन क्षमता नाही.

२) भांडवल किंवा पैशाचा पुरवठा लवचिक आहे.

३) भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर आहे.

४) उपभोग्य वस्तूंच्या मागणीतील वाढ कायम स्वरूपी आहे.

५) प्रवेग तत्वात टिकाऊ भांडवली वस्तूंचा विचार केला आहे.

६) प्रवेग तत्व हे फक्त औद्योगिक क्षेत्राताच लागू पडते.

प्रवेग तत्त्वाचे महत्त्व :

प्रवेग तत्त्वाचे फायदे किंवा महत्व थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१) उत्पन्न निर्मितीची प्रक्रिया समजते :

प्रवेग तत्त्वामुळे उत्पन्न निर्मितीची प्रक्रिया समजते. उपभोगातील बदलामुळे गुंतवणूकीत बदल होऊन उत्पन्न निर्मिती होते. ही प्रक्रिया प्रवेग तत्त्वाने समजते.

२) आर्थिक चढ–उतार समजण्यास उपयुक्त :

अर्थव्यवस्थेत उत्पादन आणि रोजगार या घटकात चढउतार का होतात, याची माहिती प्रवेग तत्त्वावरून होते.

३) भांडवली वस्तूंच्या उद्योगातील चढ–उतार समजतात :

उपभोग्य वस्तूंच्या मागणीत थोडे बदल झाले की भांडवली वस्तूंच्या मागणीत मोठी वाढ होते. उपभोग्य वस्तूपेक्षा भांडवली उद्योगात तीव्र चढ–उतार का होतात, ते प्रवेग तत्त्वावरून समजते.

४) सरकारला तेजी–मंदी नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त :

सरकारला तेजी–मंदी आटोक्यात आणण्यासाठी प्रवेग तत्त्व उपयोगी पडते. उपभोगात थोडी वाढ किंवा घट झाली तर गुंतवणुकीत फार मोठे बदल होतात हे प्रवेग तत्त्वावरून समजत असल्याने व्यापारचक्रे उद्भवू नयेत यासाठी सरकारला उपाययोजना करता येते.

प्रवेग तत्त्वाच्या मर्यादा :

१) मागणीचे स्वरूप :

उपभोग्य वस्तूंच्या मागणीत झालेली वाढ दीर्घकाळ टिकली पाहिजे. तरच उद्योजक नवीन यंत्रे बसवतील. म्हणजेच गुंतवणूक करतील. परंतु उपभोग्य वस्तूंच्या मागणीत झालेली वाढ अल्पकाळ टिकली तर उद्योजक गुंतवणूक करणार नाहीत. त्यामुळे प्रवेग परिणाम दिसून येणार नाही.

२) पूर्ण रोजगार :

अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यानंतर प्रवेग परिणाम मर्यादित राहतो. कारण पूर्ण रोजगाराची अवस्था गाठल्यानंतर भांडवली वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी साधनसामग्री उपलब्ध होत नाही.

३) पैशाचा पुरवठा :

पैशाचा किंवा पतपैशाचा पुरवठा लवचिक असेल तरच प्रवेग परिणाम दिसून येतो. परंतु पतपैशाचा पुरवठा लवचिक नसेल तर उद्योजकांना कर्जे त्वरित किंवा पुरेशी मिळणार नाहीत. त्यामुळे प्रवेग परिणाम अपेक्षेइतका राहणार नाही.

४) अतिरिक्त उत्पादन क्षमता :

भांडवली वस्तूंच्या उद्योगात अतिरिक्त उत्पादनक्षमता असेल तर उपभोग्य वस्तूंची मागणी वाढली तरी नवीन भांडवली वस्तूंची (यंत्राची) मागणी / गुंतवणूक केली जाणार नाही. कारखान्यात उपलब्ध असलेल्या यंत्रावरच उपभोग्य वस्तूंचे उत्पादन केले जाईल. त्यामुळे प्रवेग परिणाम दिसून येणार नाही.

५) भांडवल – उत्पादन गुणोत्तर :

प्रवेग तत्त्वात भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर असते असे गृहीत धरले आहे. परंतु गतिमान अर्थव्यवस्थेत भांडवल उत्पादन गुणोत्तर स्थिर नसते.

६) अर्थव्यवस्थेच्या अन्य क्षेत्रासाठी निरूपयोगी :

प्रवेग तत्त्व केवळ औद्योगिक क्षेत्राला लागू पडते. अन्य क्षेत्रांना ते लागू पडत नाही. ही प्रवेग तत्त्वाची मर्यादा आहे.

७) उपभोग आणि गुंतवणूक यातील अंतर :

प्रवेग तत्त्वाचा परिणाम त्वरित दिसून येण्यासाठी उपभोग गुंतवणूक यात फारसे अंतर असता कामा नये. म्हणजे उपभोग खर्चात वाढ झाली की लगेच गुंतवणूक वाढली पाहिजे. जर उपभोग खर्चात वाढ होऊनही गुंतवणूकीत लगेच वाढ झाली नाही तर प्रवेग परिणाम अपेक्षेइतका दिसून येणार नाही.

८) इतर घटकाकडे दुर्लक्ष :

गुंतवणूक केवळ उपभोग्य वस्तूंच्या मागणीवर अवलंबून असते हे चूक आहे. राजकीय परिस्थिती, शेअर बाजारातील परिस्थिती इत्यादी घटकांवर गुंतवणूक अवलंबून असते. हे घटक प्रवेग तत्त्वात विचारात घेतलेले नाहीत.

❑❑❑